**सन २००८-०९ करीता राज्यातील नवीन अशासकीय औ.प्र.केंद्र व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औ.प्र.केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांना परवानगी देण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांकः- आयटीआय-२००८/(२६४/०८)व्यशि-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ मे,२००८.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.आयटीआय-१०९९/(८८)/व्यशि-१, दि. १९ मे,२०००.
२) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.१२/एएफएन/२००८/(१३)/१५४ दि. १८ मार्च,२००८.

**प्रस्तावना :-** सन २००८-०९ करीता राज्यातील नवीन अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्यांसाठी संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी वर्तमान पत्रात जाहिरात दिली होती. या अनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याकरिता शासनाच्या उच्च स्तरीय समितीची दिनांक. ३ मार्च, २००८ रोजी बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यांस व विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्याच्या प्रस्तावांना परवानगी देण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** उपरोक्त पार्श्वभूमीवर आता सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील अटी व शर्तीसह कायम विना अनुदान तत्त्वावर सोबतच्या प्रपत्र "अ" (४२ नवीन केंद्र), प्रपत्र "ब" (१३ नवीन केंद्र प्रायोगिक तत्त्वावर २ (दोन) वर्षे परवानगी व प्रपत्र "क" प्रमाणे ( ५० केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या) नवीन अशासकीय औ.प्र.केंद्र व सध्या सुरु असलेल्या विद्यमान औ.प्र.केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्या सुरु करण्यांस परवानगी देण्यांत येत आहे.

(१) **अटी व शर्ती :**

**अ) नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांसाठी :- (प्रपत्र "अ")**

१) सदर नवीन संस्थांना (प्रपत्र "अ" प्रमाणे) मंजूर केलेल्या नवीन व्यवसायांसाठी संस्थेने आवश्यक त्या बाबींचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग मॅन्युअलमधील मानकानुसार १०० टक्के पूर्तता करुन आगामी होणाऱ्या स्थायी समितीतर्फे निरिक्षण करुन घेऊन सदर व्यवसाय डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन घ्यावी लागेल.

२) संस्थेने स्थायी समितीचे निरीक्षण करुन घेऊन मंजूरी दिलेल्या व्यवसायांची समितीने डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली येथे संलग्नतेसाठी शिफारस केल्यावर प्रत्यक्ष प्रवेशास संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येऊ नये.